क्र.२/नसवि/महासभा/ ०८ /२०१८-२०१९
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका
दिनांक :- १० डिसेंबर २०१८

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महानगरपालिका सभा क्रमांक - ०८/२०१८-२०१९

महानगरपालिका सभेची नोटीस

प्रति,
मा. ----------

सदस्य/सदस्या,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिका सभेचे कामकाज मधील खंड १ (ए) (एच) (आय) मध्ये केलेल्या तरतुदी नुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा **बुधवार दिनांक १९/१२/२०१८ रोजी सकाळी ११.३० वाजता पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील सभागृह मुख्यालय,सांगली** येथे आयोजित केली आहे. सदर सभेमध्ये खालील परिशिष्ठातील विषय विचाराधीन आहेत. तरी सदर सभेस आपण उपस्थित रहावे अशी विनंती आहे.

10.12.2018
महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

परिशिष्ठ

१. मागील सर्वसाधारण सभा दि.१६/११/२०१८ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.

२. सन्माननीय सदस्यांकडून दाखल होणारे -
अ) दु:खवठ्याचे ठराव.
ब) अभिनंदनाचे ठराव.

३. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४४ नुसार सन्माननीय सदस्यांकडून आलेल्या प्रश्नांची उत्तरे.

४. महानगरपालिका आमराई उद्यानातील एकत्रित ठेवलेले जळावू लाकडांचा जाहिर लिलाव करणेस व लिलाव प्रक्रिया मा.आयुक्तसो यांचे मान्यतेने पूर्ण करणेस.व त्याकामी येणारे प्रसिद्धीचे खर्चास मान्यता देणेबाबत **उपायुक्त (उद्याने विभाग) यांचे दि.२०/११/२०१८ चे विषयपत्र.**

५. स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका हागणदारीमुक्त ODF+ घोषित करणेत येवून त्याचे प्रमाणिकरण होणेबाबत तसेच, शासनाच्या स्वच्छ सर्व्हेक्षण २०१९ निर्देशानुसार स्टार रेटींग प्रमाणित करणेस मान्यता मिळणेकामी **उपायुक्त (आरोग्य विभाग) यांचे दि.१५/११/२०१८ चे विषयपत्र.**

६. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ९५ नुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेचे वार्षिक अर्थसंकल्प सादर करणेसाठी कालावधी निश्चित करणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (लेखा विभाग) यांचे दि.०७/१२/२०१८ चे विषयपत्र.**

... २ ...

७. जिल्ह्यातील बोगस वैद्यकीय व्यवसायीकांविरुद्ध कारवाई करणेकरीता जिल्हा स्तरीय पुनर्विलोकन समिती गठीत करणेत आली असून, सदर समितीचे अध्यक्ष म्हणून मा.जिल्हाधिकारी आहेत. त्यांचे अध्यक्षतेखाली बैठकीमध्ये सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये असणाऱ्या बोगस वैद्यकीय व्यवसायिकांवर कारवाई करणेकामी ज्या स्वयंसेवकांनी अथवा नागरीकांनी आरोग्य विभागाकडे माहिती पुरविलेली आहे त्या माहितीनुसार जर तो वैद्यकीय व्यवसायिक बोगस असलेचे निष्पन्न झाले तर ज्या स्वयंसेवकांने अथवा नागरीकांने माहिती दिली आहे त्या व्यक्तीस महापालिका फंडातून रु.५००/- बक्षिस देणेस मा.महासभा ठराव क्र.६४ दि.१९/०७/२०१६ अन्वये मान्यता देणेत आलेली आहे. परंतु, सांगली जिल्हास्तरीय पुनर्विलोकन समितीच्या तिमाही झालेल्या बैठकीमध्ये मनपा क्षेत्रातील सर्वसामान्य नागकरिकांना होणारा आरोग्य विषयक त्रास वा फसवणूक यास पायबंद घालणेसाठी बोगस डॉक्टर विषयी माहिती देणाऱ्या स्वयंसेवक अथवा नागरिकांना बक्षिसाची र.रु.१०००/- मात्र देणेस धोरणात्मक निर्णय घेणेकामी **उपायुक्त (आरोग्य विभाग) यांचे दि.१०/१२/२०१८ चे विषयपत्र.**

८. शासकीय पत्रव्यवहार अवलोकनी घेणे.

९. मा.महापौर, यांचे संमत्तीने दाखल होणाऱ्या ऐनवेळच्या विषयांना मान्यता देणे.

मा.महापौरसो यांचे मान्यतेने वितरीत

10-12-2018
महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सूचना (पूरवणी) कार्यक्रम पत्रिका क्रमांक ०८/२०१८-२०१९

महापालिका सभा दिनांक १९/१२/२०१८ करीता.

बुधवार दि.१९/१२/२०१८ रोजी सकाळी ११.३० वाजता पद्मभूषण डॉ.वसंतदादा पाटील सभागृह, मुख्यालय, सांगली येथे होणाऱ्या महापालिका सभेपुढे ठेवण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन "महापालिका सभेचे कामकाज" खंड १(ज) अन्वये खाली नमूद केलेल्या प्रस्तावाच्या सूचना मा.सदस्य यांचेकडून प्राप्त झाल्या आहेत.

१. **मा.ॲड.स्वाती नितीन शिंदे यांनी दिलेला प्रस्ताव :-**

सांगली वॉर्ड क्र.१६, सय्यद अमीन रस्त्यावरील सना अँटो- शेख घर ते नवप्रभात चौक ते पंचमुखी मारुती रस्त्यावरील व्यंकटेश चौक या रस्त्याला श्री.विनायक चिंतामण तथा तात्यासाहेब केळकर मार्ग असे नामकरण करणेबाबत निर्णय घेणेसाठी आलेला प्रस्ताव.

२. **मा.युवराज सतिश बावडेकर यांनी दिलेला प्रस्ताव :-**

महानगरपालिका क्षेत्रातील गवळी गल्ली येथील सरकारी तालमी शेजारील सार्वजनिक मुतारी पाडणेबाबत निर्णय घेणेसाठी आलेला प्रस्ताव.

३. **मा.सौ.वहिदा अय्याज नायकवडी यांनी दिलेला प्रस्ताव :-**

मिरज वॉर्ड क्र.६, तेली गल्ली, गुरुवार पेठ या चौकास माजी नगरसेवक पै.महंमद (बावा) काझी चौक असे नामकरण करणेबाबत निर्णय घेणेसाठी आलेला प्रस्ताव.

४. **मा.संतोष शिवदास पाटील यांनी दिलेला प्रस्ताव :-**

मा.मदनभाऊ पाटील महाराष्ट्र राज्यनाट्य एकांकिका स्पर्धा महापालिकेच्या वतीने यशस्वीरित्या पार पाडणेकरीता स्पर्धेचे आयोजन व नियोजनासाठी स्पर्धेमध्ये सर्वपक्षीय सदस्यांचा सहभाग असावा या दृष्टीकोनातून महानगरपालिका अधिनियमातील कलम ३० अन्वये १६ सदस्यांची समिती गठीत करणेकामी चर्चा करुन निर्णय घेणेसाठी आलेला प्रस्ताव.

५. **मा.संतोष शिवदास पाटील यांनी दिलेला प्रस्ताव :-**

महाराष्ट्र गुंठेवारी विकास नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण अधिनियम २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२७ मधील कलम ५ (२) नुसार गूंठेवारी क्षेत्रातील नागरिकांकडून कोणताही दंड न आकारता वाढीव बांधकामाचे प्रशमन शुल्क व विकास आकार भरुन घेणे व त्यानुसार गुंठेवारी नियमितीकरणाचे प्रमाणपत्र बदलून देणेबाबत चर्चा करुन निर्णय घेणेसाठी आलेला प्रस्ताव.

६. **मा.विष्णू माने व विनायक सिंहासने यांनी दिलेला प्रस्ताव :-**

महापालिका क्षेत्रातील गुंठेवारी नियमितीकरणाचे प्रस्ताव दाखल करुन घेणेस मुदतवाढ देणेस चर्चा करुन निर्णय घेणेसाठी आलेला प्रस्ताव.

७. **मा.विष्णू आण्णासाहेब माने यांनी दिलेला प्रस्ताव :-**

महापालिका क्षेत्रातील विजयनगर कुपवाड येथे पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांचा अर्ध पुतळा उभारणेकामी मा.शासनाची रितसर मान्यता घेणेकामी प्रस्ताव तयार करुन मान्यतेसाठी ठराव पारित करणेकामी निर्णय घेणेसाठी आलेला प्रस्ताव.

८. **मा.विष्णू माने, मा.संजय यमगर, सौ.सविता मदने यांनी दिलेला प्रस्ताव :-**

महापालिका क्षेत्रातील सांगली मिरज रस्त्यावरील विजयनगर येथील चौकास यशवंतराव होळकर चौक असे नामकरण करणेत आलेल्या ठिकाणी राजे यशवंतराव होळकर यांचा अश्वारुढ पुतळा बसविणे व त्यासाठी अंदाजपत्रकात लेखाशिर्षासह तरतुद करणेबाबत चर्चा करुन निर्णय घेणेकामी आलेला प्रस्ताव.

९. **मा.मनोज सरगर, मा.विष्णू माने, मा.संजय यमगर यांनी दिलेला प्रस्ताव :-**

धनगर समाजाचा एस.टी.प्रवर्गामध्ये आरक्षण देणेबाबत ठराव पारित करुन मा.शासनास कळविणेबाबत निर्णय घेणेसाठी आलेला प्रस्ताव.

-२-

१०. <u>मा.मनोज सरगर व सौ. वर्षा अमर निंबाळकर यांनी दिलेला प्रस्ताव</u>

वडर समाजाचा अनुसूचित जाती-जमाती प्रवर्गामध्ये आरक्षण देणेबाबत ठराव पारित करुन मा.शासनास कळविणेबाबत निर्णय घेणेसाठी आलेला प्रस्ताव.

११. <u>मा.उत्तम बाळकृष्ण साखळकर यांनी दिलेला प्रस्ताव :-</u>

अमृत अभियानातर्गत सुधारीत नळ पाणी पुरवठा योजनेचा ठेका तात्काळ रद्द होणेबाबत व ठेकेदारास बेकायदेशिररित्या आदा केलेली बिलाची रक्कम वसुल करणेबाबत चर्चा करुन निर्णय घेणेसाठी आलेला प्रस्ताव.

१२. <u>मा.मैनुद्दीन शमशुद्दीन बागवान यांनी दिलेला प्रस्ताव :-</u>

महानगरपालिका क्षेत्रातील शासन अनुदानातून होत असलेल्था कोल्हापूर-सोलापूर रस्त्यालगत महापालिकेच्या प्रस्तावित असणारा ३०.४८ मी. घा रिंगरोड रद्द करुन तो रहिवास विभागात समाविष्ठ करणेस मान्यता देणेकामी आलेला प्रस्ताव.

महापालिका सचिव कार्यालय,
महापालिका मुख्यालय, सांगली.
दिनांक : १७/१२/२०१८.

17.12
महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०८ दिनांक :- १९/१२/२०१८

ठराव क्रमांक :- ७७

विषय क्रमांक :- ०१

मागील सर्वसाधारण सभा दि.१६/११/२०१८ रोजीच्या कार्यवृत्तातील ठराव क्र.६२ ते ठराव क्र.७६ हे सभागृहात वाचून दाखविणेत आले. सदर कार्यवृत्तातील ठराव क्र.७५ अन्वये महापालिकेच्या सनियंत्रण समितीची स्थापना करणेस मान्यता देणेत आलेली आहे. सदर समिती मध्ये सदस्य मा.अजिंक्य दिनकर पाटील, सभापती स्थायी समिती यांची व मा.वर्षा अमर निंबाळकर, मा.गजानन शिवाजी अलदर मा.निरंजन सुरेश आवटी, मा.योगेंद्र भगवान थोरात, मा.गायत्री गजेंद्र कल्लोळी, मा.पांडूरंग मार्तंड कोरे यांची नियुक्ती करणेस ही सभा मान्यता देत आहे अशी दुरुस्ती ठराव क्र.७५ मध्ये करणेस ही सभा मान्यता देत असून, उर्वरित कार्यवृत वाचून ही सभा सर्वानुमते कायम करीत आहे.

सूचक :- मा. योगेंद्र भगवान थोरात ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्रीमती नितिन शिरे महापौर,

१) नगरअभियंता (कार्यालय)

२) मा. ~~[illegible]~~ महासभा लिपिक

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०८ दिनांक :- १९/१२/२०१८

ठराव क्रमांक :- ८६

विषय क्रमांक :- औचित्याचा मुद्दा (पॉईंट ऑफ ऑर्डर)

सोबतची सौ.रोहिणी सत्यजीत पाटील,सदस्य यांनी दिलेली पॉईंट ऑफ ऑर्डर दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रामध्ये महिला स्वच्छतागृहाबाबत गेल्या दोन वर्षापासून महिला सदस्यांचे वतीने पाठपुरावा सुरु आहे. त्याकरीता ४२ महिला स्वच्छतागृहे मंजूर करणेत आली आहेत. त्यापैकी १४ स्वच्छतागृहाचे काम पूर्ण झालेले आहे. मात्र त्यापैकी बऱ्याच स्वच्छता गृहामध्ये अपुरा पाणी पुरवठा, अस्वच्छता असून, बऱ्याच स्वच्छतागृहे कुलूप बंद आहेत. तसेच, उर्वरित स्वच्छतागृहांची जागा निश्चित करुन ती सुरु करणे आवश्यक आहे. महिला स्वच्छतागृहे बांधणेसाठी एजन्सी नियुक्त करणेत आलेली आहे. त्या एजन्सीवर नियंत्रण ठेवणेसाठी समिती स्थापन करणे अत्यावश्यक आहे. त्यासाठी त्या-त्या गटनेत्यांनी समिती सदस्यांची नावे सुचविणेत यावीत. समितीने तक्रारीच्या अनुषंगाने त्या-त्या प्रभागातील सदस्य व मक्तेदारा समवेत पहाणी करुन, वस्तुनिष्ठ अहवाल सादर करावा तसेच, स्वच्छतागृहे बांधणीसाठी ज्या काही त्रुटी आहेत त्या- त्या लवकरात लवकर पूर्ण करणेची कार्यवाही प्रशासनाने करणेत यावी असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- सौ.रोहिणी पाटील

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :-

महापौर,

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०८ दिनांक :- १९/१२/२०१८

ठराव क्रमांक :- ८७

विषय क्रमांक :- ०४

सोबतचे उपायुक्त (उद्याने विभाग) यांचे दि.२०/११/२०१८ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका स्थलसिमेतील धोकादायक, वठलेली व मुळे उन्मळून पडलेली झाडे तोडून ते लाकूड आमराई उद्यानात एकत्रित ठेवलेले जळावू लाकडांचे विभागीय वन अधिकारी यांनी पहाणी करुन र.रु.२३,३८५/- इतके मुल्यांकन होत असलेचे कळविले आहे. त्यानुसार जळावू लाकडाची कार्यालयाने केलेली आधारभुत किंमत र.रु.१,१२,५००/- मात्र धरुन जळावू लाकडाचा जागेवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण ५ संविदा खंड २(१) अन्वये रितसर जाहिर लिलाव करणेस व लिलाव प्रक्रिया मा.आयुक्तसो यांचे मान्यतेने पूर्ण करणेस व त्याकामी येणारे प्रसिद्धीचे खर्चास विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- Y. S Bawaw (मा. युवराज बावडेकर)

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- (मा. धीरज सुर्यवंशी)

महापौर,

शहर अभियंता (उद्याने)

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०८ दिनांक :- १९/१२/२०१८

ठराव क्रमांक :- ८८

विषय क्रमांक :- ०५

सोबतचे उपायुक्त (आरोग्य विभाग) यांचे दि.१५/११/२०१८ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका हागणदारीमुक्त ODF+ घोषित करणेत येवून त्याचे प्रमाणिकरण होणेबाबत तसेच, शासनाच्या निर्देशानुसार स्टार रेटींग प्रमाणित करणेस मान्यता मिळणेकामी प्राप्त विषयावर सभागृहात सविस्तर चर्चा करणेत येवून, ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

स्वच्छ सर्वेक्षण २०१९ अंतर्गत सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेने दोन तारांकित मानांकन (दोन स्टार रेकिंग) व ODF+ साठी सामुदायिक व सार्वजनिक शौचालयात केलेली सुधारणा, देखभाल, दुरुस्ती तसेच, शहरातील कोणताही नागरिक उघड्यावर शौचास बसू नये याकरीता केलेल्या उपाययोजना व कार्यवाही याबाबतचा कार्यालयीन अहवाल व त्यावरील आयुक्त यांची शिफारस पाहणेत आली.

मा.आयुक्तसो यांचे शिफारसीनुसार महानगरपालिका क्षेत्रातील घरोघरांचा ओला व सुका कचरा गोळा करणे, विलगीकरण करणे, वाहतुक करणे व प्रक्रिया करणे याकरीता महापालिका प्रशासनाकडून कचरा उचलणेकरीता हात ढकल गाड्या,घंटागाडीची व्यवस्था, कचरा उचलून सांगली-समडोळी व मिरज-बेडग रोडवरील कचरा डेपोवर पोहोच करणेसाठी नियोजन प्रशासनाने केलेले आहे व कंपोस्टींगसाठी विविध प्रभागात केलेले विकेंद्रीत पद्धतीने ऑरगेनी बेसड् कन्व्हर्टर मशिन ड्रेनेज पंपींग स्टेशन वखारभाग सांगली येथे बसविणेत आलेले आहे. तसेच, महापालिका मालकीच्या २४ उद्यानामध्ये बसविणेत आलेले बायोकंपोस्टींग बेड मिरज बेडग कचरा डेपोवर चालू करणेत आलेल्या विंड्रो कंपोस्टींग शहरातील दैनंदिन निर्माण होणारा ओला कचरा कंपोस्ट / प्रक्रिया करणेची व्यवस्था करणेत आलेली आहे. तसेच, जुन्या साठलेल्या कचऱ्याची दोन सेग्रीगेशन मशिनद्वारे बायोमायनिंगची प्रक्रिया सुरु आहे. महानगरपालिका दोन तारांकित मानांकन (टू स्टार रँकींग) साठी शासनाने नमुद केलेले सर्व नियम पूर्ण करीत आहे.

... २ ...

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका दि.०९/०२/२०१६ रोजी हागणदारी मुक्त म्हणून घोषीत केलेली असून, त्यास नियमाप्रमाणे दर सहा महिन्याने केंद्र शासनामार्फत तपासणी करणेत येत असून, रिसर्टीफिकेशन दि.१०/०४/२०१८ रोजी महापालिकेस प्राप्त झालेले आहे. महापालिका हद्दीत उघड्यावर शौचास कोणीही बसू नये याकरीता प्रभाग समिती क्र.०१ ते ०४ करीता शौचालय बांधकाम जागा उपलब्ध असलेल्या १००% नागरीकांकडे वैयक्तिक शौचालय उपलब्ध आहेत. तसेच, आज अखेर महापालिकेने केंद्र शासनाचे IHHL योजनेंतर्गत एकूण ३९३८ लाभार्थी कुटूंबानी वैयक्तिक शौचायल बांधून त्याचा वापर सुरु केलेला आहे. उर्वरित कुटूंबासाठी १४५३ सिट्स चे सामुदायिक व सार्वजनिक शौचालय उपलब्ध आहेत. शहरातील सर्व पेट्रोल पंप सार्वजनिक वापराकरीता खुले करणेत आलेले आहेत. तसेच, पर्यटकाकरीता प्रत्येक हॉटेल मध्ये शौचालयाची सुविधा उपलब्ध आहे. त्यामुळे शहरातील सर्व नागरीकांसाठी शौचालय सुविधा पुरेशी उपलब्ध असलेमुळे उघड्यावर कोणीही व्यक्ती शौचास बसत नसलेमुळे स्वच्छ सर्व्हेक्षण २०१९ अंतर्गत सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका ODF+ व दोन तारांकित मानांकन (टू स्टार रँकींग) म्हणून घोषित करणेस ही सभा मान्यता देत आहे. याबाबत योग्यती पुढील कार्यवाही प्रशासनाने करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- Y. S. Bammanavar
(मा. युवराज बावडेकर)

अनुमोदक :- [signature]
(मा. पांडुरंग कोरे)

ठराव सर्वानुमते मंजुर

[signature]
महापौर,

आरोग्याधिकारी,

[signature]
महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०८ दिनांक :- १९/१२/२०१८

ठराव क्रमांक :- ८९

विषय क्रमांक :- ०६

सोबतचे उपायुक्त (लेखा विभाग) यांचे दि.०७/१२/२०१८ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ९५ नुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेचे वार्षिक अर्थसंकल्प सादर करणेसाठी मा.महासभा ठराव क्र.१ दि.२०/०४/२००१ अन्वये अर्थसंकल्प सादर करणेस कालावधी निश्चित करणेस मान्यता देणेत आली होती. सदर ठरावान्वये निश्चित करणेत आलेल्या कालावधी मध्ये सर्व विभागांच्या जमा-खर्चाच्या बाजू संबंधी मा.आयुक्तसो यांचे निर्देशानुसार आवश्यकतो फेरफार करुन, जमा व खर्चाचे माहिती विहित वेळेत लेखा विभागास प्राप्त होत नसल्यामुळे, मा.स्थायी समितीस अंदाजपत्रक सादर करणेस दरवर्षी विलंब होतो ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे महानगरपालिकेचे अंदाजपत्रक सादर करणेस यापूर्वी मा.महासभेने निश्चित केलेल्या तारखा सुधारीत करणे आवश्यक आहे. त्यानुसार खालील प्रमाणे सुधारीत तारखेनुसार महानगरपालिकेचे अंदाजपत्रक सादर करणेस कालावधी निश्चित करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

१.	मा.आयुक्त यांनी मा.स्थायी समितीकडे सादर करावयाचा अंतिम दिनांक	३१ जानेवारी प्रतिवर्ष
२.	मा.स्थायी समितीने कलम ९६ अन्वये महासभेकडे शिफारस करणेचा अंतिम दिनांक	२८ फेब्रुवारी प्रतिवर्ष
३.	महासभेने कलम १०० अन्वये अर्थसंकल्पास अंतिम स्विकृती देणेचा दिनांक	३१ मार्च प्रतिवर्ष

उपरोक्त निश्चित करणेतआलेल्या कालावधीनुसार यापुढे प्रशासनाने कार्यवाही ठेवणेत यावी असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- (मा.युवराज आवडेकर)

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- (मा. धीरज सुर्यवंशी)

महापौर,

मुख्य लेखाधिकारी.

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०८ दिनांक :- १९/१२/२०१८

ठराव क्रमांक :- ९०

विषय क्रमांक :- ०७

सोबतचे उपायुक्त (आरोग्य विभाग) यांचे दि.१०/१२/२०१८ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

जिल्ह्यातील बोगस वैद्यकीय व्यवसायीकांविरुद्ध कारवाई करणेकरीता जिल्हा स्तरीय पुनर्विलोकन समिती गठीत करणेत आली असून, सदर समितीचे अध्यक्ष म्हणून मा.जिल्हाधिकारी आहेत. त्यांचे अध्यक्षतेखाली बैठकीमध्ये सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये असणाऱ्या बोगस वैद्यकीय व्यवसायिकांवर कारवाई करणेकामी ज्या स्वयंसेवकांनी अथवा नागरीकांनी आरोग्य विभागाकडे माहिती पुरविलेली आहे त्या माहितीनुसार जर तो वैद्यकीय व्यवसायिक बोगस असलेचे निष्पन्न झाले तर ज्या स्वयंसेवकांने अथवा नागरीकांने माहिती दिली आहे त्या व्यक्तीस महापालिका फंडातून रु.५००/- बक्षिस देणेस मा.महासभा ठराव क्र.६४ दि.१९/०७/२०१६ अन्वये मान्यता देणेत आली होती. परंतु, सांगली जिल्हास्तरीय पुनर्विलोकन समितीच्या झालेल्या तिमाही बैठकीमध्ये मा.जिल्हाधिकारीसो तथा अध्यक्ष, जिल्हास्तरीय पुनर्विलोकन समिती यांनी सूचित केलेनुसार महानगरपालिका क्षेत्रामध्ये असणाऱ्या बोगस वैद्यकीय व्यवसायिकांवर कारवाई करणेकामी रु.५००/- ऐवजी रु.२५००/- मात्र बक्षिस देणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

उक्त कामी येणारा खर्च विषयपत्रातील नमुद अर्थसंकल्पीय तरतुदी मधून होणेचा आहे.

सूचक :- Y. S Bamuny
मा. युवराज बावडेकर

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा. आनंदा देवमाने

महापौर,

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०८ दिनांक :- १९/१२/२०१८

ठराव क्रमांक :- ९१

विषय क्रमांक :- १ (ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सदस्य ॲड.स्वाती नितिन शिंदे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली वॉर्ड क्र.१६, सय्यद अमीन रस्त्यावरील सना ॲटो- शेख घर ते नवप्रभात चौक ते पंचमुखी मारुती रस्त्यावरील व्यंकटेश चौक या रस्त्याला श्री.विनायक चिंतामण तथा तात्यासाहेब केळकर मार्ग असे नामकरण करणेस प्रस्ताव सादर करणेत आला आहे. प्रस्तुतचा विषय ही सभा रद्द करीत आहे.

सूचक :- सा. आनंदा देवमाने

अनुमोदक :- सा. गणेश माळी

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०८ दिनांक :- १९/१२/२०१८

ठराव क्रमांक :- ९२

विषय क्रमांक :- १ (ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सदस्य मा.युवराज सतिश बावडेकर यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील गवळी गल्ली,सांगली येथील सरकारी तालमी शेजारील अस्तित्वात असलेली सार्वजनिक मुतारी ही अत्यंत धोकादायक झाली असून, ती पाडणे आवश्यक आहे. सदर ठिकाणी दुर्धंगी पसरुन नागरीकांचे आरोग्यास धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर ठिकाणच्या धोकादायक मुतारीमुळे नागरीकांचेकडून सदर मुतारी पाडणेस वारंवार मागणी होत आहे. यासाठी सदरची धोकादायक मुतारी पाडणेस ही सभा मान्यता देत असून, प्रशासनाने योग्यती कार्यवाही ठेवणेस ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- Y. S Bawadekar

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

वैद्य आरोग्याधिकारी

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०८ दिनांक :- १९/१२/२०१८

ठराव क्रमांक :- ९३

विषय क्रमांक :- १ (ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सदस्य मा.वहिदा अय्याज नायकवडी यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

मिरज वॉर्ड क्र.६, तेली गल्ली, गुरुवार पेठ या चौकास माजी नगरसेवक पै.महंमद (बावा) काझी यांचे सामाजिक,राजकीय व शैक्षणिक कार्य व गोरगरीबांच्या केलेली हिताची कामे वाखाणण्यासारखी असल्याने त्यांचे नाव चिर:काल स्मरणात राहणेकरीता सदर चौकास माजी नगरसेवक पै.महंमद (बावा) काझी चौक असे नामकरण करणेस मा.महासभेने निश्चित केले धोरणानुसार योग्यती कार्यवाही ठेवणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- Y. S Barwade
(मा. युवराज बावडेकर)

ठराव सर्वानुमते मंजुर
महापौर,

अनुमोदक :-
(मा. भारती दिगडे)

मा.आयुक्त व्यवस्थापक

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०८ दिनांक :- १९/१२/२०१८

ठराव क्रमांक :- ९५

विषय क्रमांक :- १ (ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सदस्य मा.संतोष शिवदास पाटील यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

गुंठेवारी नियमितीकरणानंतर महानगरपालिका क्षेत्रात अनेक नागरिकांनी वाढीव बांधकाम कलेले आहे. सन २००६ च्या शासन निर्णयानुसार अनाधिकृत बांधकामांना दुप्पट शास्ती लावण्यास आदेश पारित झालेले आहेत. परंतु सन २००८ मध्ये महासभेने पारित केलेल्या ठरावान्वये गुंठेवारी मधील बांधकामांना सदर आदेशाच्या अंमलबजावणी मधून वगळणेत आले असून, महापालिकेतील गुंठेवारी मधील नागरिकांनी गुंठेवारी नियमितीकरणानंतर वाढीव बांधकामाकरीता परवाने घेणे आवश्यक होते. परंतु बहुतांश नागरिकांनी सदर ठरावाचा आधार घेवून, बांधकाम परवानगी न घेता, शास्ती विरहीत घरपट्टी आकारणी करुन घेतल्यामुळे गुंठेवारी नागरिकांनी केलेल्या वाढीव बांधकामाच्या करापोटी मिळणाऱ्या रक्कमेतून महापालिकेच्या उत्पन्नात वाढ होणार आहे. त्यासाठी महाराष्ट्र गुंठेवारी विकास नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण अधिनियम २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२७ मधील कलम ५ (२) नुसार गूंठेवारी क्षेत्रातील नागरिकांकडून कोणताही दंड न आकारता वाढीव बांधकामाचे प्रशमन शुल्क व विकास आकार भरुन घेणेस व त्यानुसार गुंठेवारी नियमितीकरणाचे प्रमाणपत्र बदलून देणेस ही सभा मान्यता देत असून, प्रशासनाने योग्यती कार्यवाही करणेस ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- महापौर,

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०८ दिनांक :- १९/१२/२०१८

ठराव क्रमांक :- ६६

विषय क्रमांक :- १ (ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सदस्य मा.विष्णू आण्णासाहेब माने व मा.विनायक रमेश सिंहासने यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महापालिका क्षेत्रातील गुंठेवारी नियमितीकरणाचे प्रस्ताव दाखल करुन घेणेस मुदतवाढ देणेस चर्चा करुन निर्णय घेणेसाठी आलेला प्रस्तावावर सभागृहात सविस्तर झाले चर्चेनुसार सद्या महापालिका क्षेत्रामध्ये सर्वांसाठी घरे २०२२ या सारख्या मोठ्या महत्त्वाकांक्षी योजना राबविल्या जात आहेत. त्या योजनेचा लाभ सर्वांना मिळणेकरीता सांगली मिरज आणि कुपवाड शहर महापालिका क्षेत्रातील गुंठेवारी नियमितीकरणाचे जे पुर्वी दाखल झालेले प्रस्ताव आहेत. परंतु अद्यापी प्रलंबित आहेत असे जे काही प्रलंबित प्रस्ताव आहेत ते प्रस्ताव सत्वर निकाली काढणेसाठी व नागरीकांच्या सोईच्या दृष्टीने कॅम्पस् घेणेस तसेच, गुंठेवारी नियमितीकरणाचे नविन प्रस्तावासाठी दि.३१ डिसेंबर २०१९ पर्यंत दाखल करुन घेवून, निकाली काढणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- (मा.युवराज बावडेकर)

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

अनुमोदक :- (मा.विष्णू माने)

सहा. संचालक नगररचना

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०८ दिनांक :- १९/१२/२०१८

ठराव क्रमांक :- ९७

विषय क्रमांक :- १ (ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सदस्य मा.विष्णू आण्णासाहेब माने यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महापालिका क्षेत्रातील विजयनगर कुपवाड येथे पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांचा अर्ध पुतळा उभारणेकामी मा.शासनाची रितसर मान्यता घेणेकामी प्रस्ताव तयार करुन मान्यतेसाठी ठराव पारित करणेकामी निर्णय घेणेसाठी आलेला प्रस्तावावर सविस्तर प्रस्ताव सादर करणेत यावा असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- Y. S Bamanyar (मा. युवराज बावडेकर)

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- (मा. विष्णू माने)

महापौर,

शहर अभियंता

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०८ दिनांक :- १९/१२/२०१८

ठराव क्रमांक :- ९८

विषय क्रमांक :- १ (ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सदस्य मा.विष्णू माने, मा.संजय यमगर, सौ.सविता मदने यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महापालिका क्षेत्रातील सांगली मिरज रस्त्यावरील विजयनगर येथील चौकास यशवंतराव होळकर चौक असे नामकरण करणेत आलेल्या ठिकाणी राजे यशवंतराव होळकर यांचा अश्वारुढ पुतळा बसविणे व त्यासाठी अंदाजपत्रकात लेखाशिर्षासह तरतुद करणेबाबत चर्चा करुन निर्णय घेणेकामी आलेला प्रस्तावावर सविस्तर प्रस्ताव सादर करणेस ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- Y. S Bamanwar (मा. युवराज बावडेकर)

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- (मा. भारती दिगडे)

महापौर,

शहर अभियंता

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०८ दिनांक :- १९/१२/२०१८

ठराव क्रमांक :- ९९

विषय क्रमांक :- १ (ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सदस्य मा.मनोज सरगर, मा.विष्णू माने, मा.संजय यमगर यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महाराष्ट्राच्या अनुसूचित जमाती यादीत धनगर ऐवजी धनगड असा अपभ्रंश करुन धनगर जमातीस आरक्षणापासून वंचित ठेवले जात आहे. महाराष्ट्रात एकही धनगड अस्तित्वात नाही. महाराष्ट्रात अस्तित्वात असलेली धनगर जमात अनुसूचित जमातीत आहे. सन १८३२ पासून १९५० पर्यतचे पुरावे जमातीकडे आहेत. त्यामुळे महाराष्ट्राच्या अनुसूचित जमाती यादीत धनगड ऐवजी धनगर अशी दुरुस्ती राज्यघटनेच्या अनुच्छेद कलम ३४२(१) अन्वये करुन धनगर एस.टी.प्रवर्गात आरक्षण देणेची अंमलबजावणी केल्यास समाजातील गरीब व आर्थिक दृष्ट्या दुर्बल असलेल्या कुटूंबास याचा लाभ होणार आहे. हा समाज शेती व मेंढपाळ व्यवसायावर अवलंबून असल्यामुळे अद्यापही मागास राहिलेला असल्यामुळे या धनगर समाजास केवळ भटक्या जमाती मधील ३.५% आरक्षण दिले गेल्यामुळे शैक्षणिक,सामाजिक व राजकीय क्षेत्रामध्ये राज्यातील दुसऱ्या क्रमांकाची समाजाची लोकसंख्या विचारात घेता सदरचे आरक्षण अत्यल्प आहे. यासाठी धनगर समाजाचा एस.टी.प्रवर्गामध्ये आरक्षण देणेस ही शिफारस करीत असून, सदरचा प्रस्ताव मा.शासनास कळविणेस प्रशासनाने योग्यती कार्यवाही करणेस ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- Manoj R Sargar

महापौर,

उपरालकीय अधिकारी

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०८ दिनांक :- १९/१२/२०१८

ठराव क्रमांक :- १००

विषय क्रमांक :- १ (ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सदस्य मा. मनोज सरगर व सौ. वर्षा अमर निंबाळकर यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

वडर समाज अत्यंत कष्टाळू असून, वडर समाजाची अवस्था अत्यंत बिकट आहे. या समाज बांधवाना आजही दगड फोडण्याचे काम करावे लागत आहे. खडी व्यवसायात उतरलेल्या समाज बांधवाना शासनाच्या जाचक अटीमुळे उद्योग सोडावा लागतो आहे. स्वातंत्र्याची ७० वर्षे झाली परंतु राज्यातील वडर समाज अत्यंत हालाखीचे जीवन जगत असून, आरक्षणचा लाभ मिळाल्यास वडर समाजबांधवाची आर्थिक व सामाजिक उन्नती होईल. शेजारील कर्नाटक, तेलंगना,आंध्रप्रदेश या राज्यांमध्ये वडर समाजाचा अनुसूचित जाती-जमाती प्रवर्गामध्ये समाविष्ट आहे. त्या अनुषंगाने महाराष्ट्रातील वडर समाजाच्या विकासासाठी एक देश-एक प्रवर्ग या प्रमाणे आरक्षण देवून, महाराष्ट्रातही वडर समाजाचा अनुसूचित जाती-जमाती प्रवर्गामध्ये समाविष्ट करुन आरक्षण देणेस ही शिफारस करीत असून, सदरचा प्रस्ताव मा.शासनास कळविणेस प्रशासनाने योग्यती कार्यवाही करणेस ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- सौ. वर्षा अमर निंबाळकर

अनुमोदक :- Manoj R. Sargar
मनोज सरगर

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०८ दिनांक :- १९/१२/२०१८
२४/१२/२०१८

ठराव क्रमांक :- १०१

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सदस्य मा.उत्तम बाळकृष्ण साखळकर यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

अमृत अभियांनातर्गत मिरज सुधारीत नळ पाणी पुरवठा योजनेचा ठेका तात्काळ रद्द होणेबाबत व ठेकेदारास बेकायदेशिररित्या आदा केलेली बिलाची रक्कम वसुल करणेबाबत चर्चा करुन निर्णय घेणेसाठी आलेल्या प्रस्तावावर सभागृहामध्ये उपस्थित सदस्यांनी विविध मते मांडली. त्यातील प्रत्येक मुद्दयावर प्रशासनाकडून करणेत आलेल्या खुलासा बाबत ही चर्चा करणेत आली. चर्चेअंती ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

१. अमृत अभियांनातर्गत सुधारीत मिरज पाणी पुरवठा योजना अखंडीतपणे सुरु राहील. कोणत्याही परिस्थितीत योजनेचे काम बंद पडता कामा नये. मात्र, मक्तेदारांकडून कोणत्याही कारणास्तव काम बंद केलेस, मक्तेदाराची निविदा रद्द करणेची कार्यवाही करण्यात यावी. योजना मंजूरीबाबत अनियमितता झालेचे सकृत दर्शनी सिद्ध होत आहे. त्यामुळे प्रस्तुत योजनेची निविदा प्रक्रिया व त्या अनुषंगिक सर्व प्रकरणाचे विशेष लेखापरिक्षण करुन घेणेत यावे.

२. स्थायी समिती ठराव क्र.३४२ दि.३१/०५/२०१८ हा ऐनवेळच्या विषयात पारित केलेला ठराव असलेने, सदरचा ठराव हा बोगस व बेकायदेशिर असल्याचे सभागृहाचे मत झाले आहे. याबाबत निवृत्त न्यायाधिशा मार्फत चौकशी करुन, निवृत्त न्यायाधिशांचा अहवाल सभागृहापुढे पुढील सभेपूर्वी सादर करावा.

३. उपरोक्त विशेष लेखापरिक्षण व निवृत्त न्यायाधिशा मार्फत केलेला चौकशी अहवाल पुढील महासभेत सादर करणेत यावा. तोपर्यंत मक्तेदारास अंदाजपत्रकीय दरापेक्षा जादा दराने मंजूर केलेल्या निविदा दराची देयके आदा करणेत येवू नयेत. असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- (मा. श्रीनंदा देवमाने)

अनुमोदक :- (मा. धीरज सुर्यवंशी)

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

पा.पु. अधिक्षक (मिरज)

प्रस्तुत १(ज) खाली पारित झालेला ठराव मा. आयुक्त यांचे निदर्शनास आणुन पुढील कार्यवाही करणेची.

महापालिका सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०८ दिनांक :- १९/१२/२०१८
२४/१२/२०१८

ठराव क्रमांक :- १०२

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सदस्य मा.मैनुद्दीन शमशुद्दीन बागवान यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील शासन अनुदानातून होत असलेल्या कोल्हापूर-सोलापूर रस्त्यालगत महापालिकेचा प्रस्तावित असणारा ३०.४८ मी. चा रिंगरोड रद्द करुन तो रहिवास विभागात समाविष्ठ करणेस मान्यता देणेकामी आलेल्या प्रस्तावावर सविस्तर प्रस्ताव सादर करणेत यावा असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- (मा. युवराज बावडेकर) ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- (मा. अपोश माणे) महापौर,

सहा. संचालक (नगररचना)

प्रस्तुत (१(ज) खाली पारित झालेला ठराव मा. कोल्हापूर यांचे निदर्शनास कोणत्या पुढील कार्यवाही करावी.

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका